230

नमुना 2

अनुदानित तत्त्वावर
(मराठी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्रशा/ 9543 /2022
पुणे-1 दिनांक - 31/ 1/2022

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
राजगड ज्ञानपीठ भोर ता.भोर जि.पुणे संचलित सरनोबत सिदोजी थोपटे विद्यालय व ज्यु.कॉलेज,खानापुर, ता.भोर जि.पुणे

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 याचा नियम 11, पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर वेळोवेळी शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे दिनांक 1 एप्रिल 2019 ते

पासून दिनांक 31 मार्च 2022 पर्यंत इ. 5 वी ते 8 वीसाठी राजगड ज्ञानपीठ भोर ता.भोर जि.पुणे संचलित सरनोबत सिदोजी थोपटे विद्यालय व ज्यु.कॉलेज,खानापुर, ता.भोर,जि.पुणे शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इथून पुढे त्यानंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

2.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) यांतील तरतुदींचे शाळा पालन करील.

3.शाळा कोणकोणत्या तुकडीला आणि कोणत्या वर्गातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणाचे अनुपालन करण्यात येईल.

4.परिपत्रक 3 मध्ये विहित केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते उघडावे लागेल.

5. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी फीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या पालक,विद्यार्थास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6 कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म,जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

7(एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास ती ज्या इयत्तेत आहेत त्याच इयत्तेत ठेवून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन)कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन)कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार)प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास, नियम 23 अन्वये विहीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच)विकलांग / [illegible] असलेल्या विशेष गरजा असलेल्या बालकांसाठी अधिनियमाच्या तरतुदीनुसार सवलत करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 24(1) अन्वये विहीत केलेले किमान आणि योग्य कामाच्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल, परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या तरतुदीनुसार विद्यार्थास किमान आहेत धारण व करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान आहेत 5 वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/ तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8. [illegible] कामांतील [illegible] [illegible] [illegible]